नि.फौ.ख.क्र.१०३/२०१८.
सरकार वि. भोजराज व इतर
निशाणी क्र.१८३.

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०६ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** - सुरेंद्र रामरावजी पाटील
**वय** - ३३ वर्षे **व्यवसाय** - वनरक्षक,
**राहणार** - सावरगाव, तह.नरखेड, जिल्हा नागपूर.

**सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.एम.राऊत यांच्या तर्फे**

**०१.** मी मागे हजर आरोपींना ओळखतो. कारण ते दि.०५.०५.२०१८ रोजी आरोपी यांना दक्षिण बोदलजीरा बीट कंपार्टमेंट क्रं. ५२८ राखीव वन मॅगझीन नाला २ या पायवाट रस्त्यावर त्यांनी आत्मसर्मपण केलेले होते. आरोपी यांनी मासेमारी करण्याकरीता तोतलाडोह जलाशयामध्ये अपप्रवेश केलेला होता. त्याच्याजवळ मासे पकडण्याचे जाळे, गळ, जर्मनचे गंज, खंडा हे साहित्य त्यांच्याकडे मिळून आले.

**०२.** त्यावेळेस मी पूर्व पेंच पिंपरीया येथील दक्षिण सलामा बीटमध्ये कार्यरत होतो. त्यावेळेस मी माझ्या बीटामध्ये मुख्यालयात होतो व आम्हाला एस.टी.पी.एफ. चे जवान बोटीने जलाशयात गस्ती करत होते. त्यांना सदर आरोपी निर्दशनास आले त्यासंबंधीची माहिती त्यांनी वार्यरलेस द्वारे दक्षिण सलामा बेझ स्टेशला दिली.

**०३.** क्षेत्र साहायक खोरगडे साहेब यांनी सदर माहिती आम्हाला दिली व तत्काळ आम्हाला जावे लागेल असा संदेश दिला व त्यामुळे आम्ही सर्व वनअधिकारी, वनमजुर, हंगामी वनमजुर असे १० ते १२ लोक शासकीय वाहनाने घटनास्थळी गेलो. घटनास्थळी आम्ही दोन ग्रुपने डिवाईड होऊन आम्ही दबा धरून बसलो. अंदाजे सायं. ४ ते ५ च्या दरम्यान आम्हाला काही मासेमारी लोक दिसताच आम्ही त्याला अटकाव घातला आणि आम्ही त्यांना विचारणा केली की, कशासाठी आले आहे? तर त्यांच्याकडे उपलब्ध साहित्यांचा व त्यांच्या सांगण्यावरून असे निर्दशनास आले की, आरोपीने मासेमारी करण्याकरीता आले होते. त्यानंतर आमचे वनअधिकारी खोरगडे साहेब व एस.टी.पी.एफ.चे चाटी साहेब या सर्वांनी त्यांना आत्मसर्मपण करण्यास भाग पाडले व त्यांनी आत्मसर्मपण केले त्यानंतर शासकीय वाहनाने त्यांना पूर्व पेंच पिंपरीया येथे शासकीय कार्यालयात आणले.

**०४.** घटनास्थळी सदर साहित्य जप्त करून मोका पंचनामा व जप्तीनामा केला. आता मला मोका पंचनामा नि.क्रं.२९ दाखविला. त्यावर पंच म्हणून माझी व भूषण राऊत यांची सही आहे. तसेच चाटी साहेब व खोरगडे साहेब व आरोपींच्या सह्या व अंगठे आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**०५.** आता मला जप्तीनामा नि.क्रं.२७ दाखविला. त्यावर पंच म्हणून माझी व भूषण राऊत यांची सही आहे. तसेच देवकर साहेब व खोरगडे साहेब व आरोपींच्या सह्या व

अंगठे आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**०६.** जप्त मुद्देमाल दाखविण्यास मी ओळखू शकतो. आता साक्षीदाराला फोटो दाखविण्यात आला.तो तोच आहे. त्यास आर्टिकल-अ देण्यात येते. सदरचा मुद्देमाल हा खोरगडे साहेबांच्याकडे सुपूतनाम्यावर देण्यात आला होता. आता मला सुपूतनामा नि.क्रं.२८ दाखविला. त्यावर पंच म्हणून माझी व भूषण राऊत यांची सही आहे. तसेच खोरगडे साहेब यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**०७.** आरोपींचे दुसऱ्या दिवशी बयाण नोंदविण्यात आले. माझे बयाण दि.०६.०५.२०१८ रोजी नोंदविले. आता मला माझे बयाण नि.क्रं.१०२ दाखविला. त्यावर माझी, देवकर साहेब व खोरगडे साहेब यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलट तपासणी आरोपी क्र.१,४, ५, ७ ते ९,११,१३ ते १५,१७ ते १९ व २१ ते २३ करीता श्री ए.व्ही.गजभिये यांचेतर्फे</u>**

**०८.** मी बयाण देतांना आरोपींकडून गंज, जाळे, गळ व खंडा हे साहित्य मिळून आले होते हे सांगितले होते. तसेच बयाण देतांना खोरगडे साहेबांनी आम्हाला घटनास्थळ त्वरीत जावे लागेल असे संदेश दिला, तसेच आम्ही घटनास्थळी दबा धरून बसलो होतो, तसेच काही मासेमारी हयांना अटकाव घातला व त्यांना विचारणा केली व त्यांच्या साहित्यावरून मासेमारी करण्याकरीता आले होते असे निर्देशनास आले, तसेच चाटे साहेबांनी त्यांना आत्मसर्मपण करण्यास सांगितले व त्यांनी आत्मसर्मपण केले, तसेच घटनास्थळावर त्यांच्याकडून साहित्य जप्त करण्यात आले होते, हयाबाबी सांगितल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाबी माझ्या बयाणात शब्दानिशी तश्याप्रकारे नाही.
हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, सदर बाबी माझ्या बयाणात शब्द: नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर बाबी घडल्या नव्हत्या म्हणून माझ्या बयाणात नमुद नाही.

**०९.** दक्षिण सलामाचे बेस स्टेशन सलामा येथे जंगलातच आहे. पिंपरीया पासून मॅगझीन नाला हा १० ते १५ किलो मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वेळेस वायरलेस द्वारे मॅसेज येतो त्यावेळेस त्याची नोंद घेण्याकरीता तेथे एक कर्मचारी नियुक्त असतो व त्या संदेशची तेथे नोंद घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, तसेच आम्ही गस्तीकरीता जंगलात जातो त्याबाबत देखील रजिस्टरमध्ये नोंद घेतली जाते.

**१०.** दि.०५.०५.२०१५ रोजी मी दक्षिण सलामा येथे राहण्यास होतो. पिंपरीया कार्यालयापासून दक्षिण सलामा हे ८ ते १० किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहनांच्या मुव्हमेंटच्या वेगळया नोंदी घेतल्या जातात.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, ते दि.०५.०५.२०१८ रोजी आरोपी यांना दक्षिण बोदलजीरा बीट कंपार्टमेंट क्रं. ५२८ राखीव वन मॅगझीन नाला २ या पायवाट रस्त्यावर त्यांनी आत्मसर्मपण केलेले होते व आरोपी यांनी मासेमारी

करण्याकरीता तोतलाडोह जलाशयामध्ये अपप्रवेश केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्याच्याजवळ मासे पकडण्याचे जाळे, गळ, जर्मनचे गंज, खंडा हे साहित्य त्यांच्याकडे मिळून आले.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यावेळेस मी पूर्व पेंच पिंपरीया येथील दक्षिण सलामा बीटमध्ये कार्यरत होतो व मी माझ्या बीटामध्ये मुख्यालयात होतो व आम्हाला एस.टी.पी.एफ. चे जवान बोटीने जलाशयात गस्ती करत होते व त्यांना सदर आरोपी निर्दशनास आले त्यासंबंधीची माहिती त्यांनी वार्यरलेस द्वारे दक्षिण सलामा बेझ स्टेशला दिली.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, क्षेत्र साहायक खोरगडे साहेब यांनी सदर माहिती आम्हाला दिली व तत्काळ आम्हाला जावे लागेल असा संदेश दिला व त्यामुळे आम्ही सर्व वनअधिकारी, वनमजुर, हंगामी वनमजुर असे १० ते १२ लोक शासकीय वाहनाने घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, घटनास्थळी आम्ही दोन ग्रुपने डिवाईड होऊन आम्ही दबा धरून बसलो व अंदाजे सायं. ४ ते ५ च्या दरम्यान आम्हाला काही मासेमारी लोक दिसताच आम्ही त्याला अटकाव घातला आणि आम्ही त्यांना विचारणा केली की, कशासाठी आले आहे? तर त्यांच्याकडे उपलब्ध साहित्यांचा व त्यांच्या सांगण्यावरून असे निर्दशनास आले की, आरोपीने मासेमारी करण्याकरीता आले होते.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यानंतर आमचे वनअधिकारी खोरगडे साहेब व एस.टी.पी.एफ.चे चाटी साहेब या सर्वांनी त्यांना आत्मसर्मपण करण्यास भाग पाडले व त्यांनी आत्मसर्मपण केले त्यानंतर शासकीय वाहनाने त्यांना पूर्व पेंच पिंपरीया येथे शासकीय कार्यालयात आणले.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, घटनास्थळी सदर साहित्य जप्त करून मोका पंचनामा व जप्तीनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व कागदपत्रांवर खोरगडे साहेब यांचया सांगण्यावरून सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणतेही सुपृतनामा व पंचनामा तयार करण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे वन खड क्रं.५२८ मॅगझीन नाला येथे मिळून आले नव्हते व त्यांच्याकडे कोणतेही साहित्य जप्त करण्यात आले नव्हते व त्यांनी कोणतेही बयाण दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल-अ वरील फोटो खोटा तयार केलेला आहे.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, नि.क्रं.१०२ वरील बयाण खोरगडे साहेबांनी खोटे तयार केले व त्यांच्या सांगण्यावरून खोटया सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत आहे त्याप्रमाणे तथाकथीत कोणतीही घटना घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोरगडे साहेबांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पुर्ण</u>

**<u>उलटतपास आरोपीं क्र.३,६,१०,१२,१६,२०,२४ करीता ॲड.श्री.ए.जी.कारेमोरे यांनी वरील उलटतपास आरोपीं करीता गृहीत धरण्याकरीता सांगण्यात आले. वरील उलटतपास आरोपींकरीता गृहीत धरण्यात आला.</u>**

**<u>उलटतपास पुर्ण</u>**
**<u>फेरतपास काही नाही</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-
**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट.न.२, रामटेक

रामटेक
दिनांक - ०६/०२/२०२५